पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १६

**सभावृत्तांत**

दिनांक - **१७/११/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१७/११/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सोनवणे शारदा हिरेन - सभापती**
२. मा.अश्विनी संतोष जाधव - उपसभापती
३. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
४. मा.भोईर सुरेश शिवाजी
५. मा.चिंचवडे सचिन बाजीराव
६. मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
७. मा.कोकणे संतोष अंकुश
८. मा.यादव मीनल विशाल

या शिवाय मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.सवणे, मा.जुंधारे, मा.ओंबासे – कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) मा.तुषार रघुनाथ हिंगे, नगरसदस्य यांचे मा.महापालिका सभेच्या अनुपस्थितीबाबत – मा.अश्विनी जाधव, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रभाग क्र.३९ मधील मंडप विषयक कामाची सुधारित अंदाजपत्रकास मंजूरी देणेबाबत – मा.अश्विनी जाधव, मा.स्वीनल म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) काळेवाडी सर्व्हे नं.१३० मधील नाल्यापसून ते काळेवाडी मुख्य रस्त्यापर्यंत नदी समांतर १८.०० मी.रुंद डी.पी.रस्त्याचे रुंदीकरण करणे व हॉटमिक्स पध्दतीने डांबरी करण करणे या कामातून प्रभाग क्र.४७ काळेवाडी मधील इतर अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणेस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत - मा.अश्विनी जाधव, मा.स्वीनल म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) प्रभाग क्र.६० येथे जुने संडास ब्लॉकचे नुतनीकरण करणे - मा.अश्विनी जाधव, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) प्रभाग क्र.६० मधील पवना नदी काठी बैठकव्यवस्था करणे या कामाअंतर्गत कामाचे ठिकाण बदलणेबाबत - मा.अश्विनी जाधव, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) काळेवाडी फाटा ते देहु-आळंदी रस्त्यावर बीआरटीएस बस थांब्याची उर्वरीत काम करणेच्या कामामधून दापोडी ते निगडी या रस्त्यावरील बस थांब्याची उर्वरीत कामे करणेच्या स्थळ बदलास मान्यता देणेबाबत – मा.स्वीनल म्हेत्रे, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) बोपखेल फाटा ते आळंदी रस्ता विकसीत करणे भाग २ सा.क्र.७/०४० ते ८/२५० (चोवीसावाडी ते काटे कॉलनी) या कामाअंतर्गत लगतच्या जोड रस्त्याचे काम करणेच्या स्थळबदलास मान्यता देणेबाबत - मा.स्वीनल म्हेत्रे, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **०६/११/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १५)** सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ४७ | विषय क्रमांक – ०१
दिनांक – १७/११/२०१७ | विभाग – प्रशासन
सुचक – मा.सुरेश भोईर | अनुमोदक – मा.अश्विनी जाधव
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/७४८/२०१७, दि.२९/०९/२०१७

विषय – वैद्यकीय उपअधिक्षक पदावर करावयाच्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४८ | विषय क्रमांक – ०२
दिनांक – १७/११/२०१७ | विभाग – प्रशासन
सुचक – मा.मीनल यादव | अनुमोदक – मा.स्वाती काटे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/७४९/२०१७, दि.२९/०९/२०१७

विषय – जेष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर करावयाच्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ४९ विषय क्रमांक – ०३
दिनांक – १७/११/२०१७
सुचक – मा.अश्विनी जाधव अनुमोदक – मा.सुरेश भोईर
संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव –

मा.तुषार रघुनाथ हिंगे, नगरसदस्य यांनी त्यांचे व्यक्तीगत न्यायालयीन कामकाजासाठी बाहेरगावी असल्याने मा.महापालिकेच्या माहे नोव्हेंबर २०१७ व डिसेंबर २०१७ मध्ये होणा-या सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मिळणेकामी दि.१३/११/२०१७ रोजीचे पत्रान्वये विनंती केली असल्याने श्री.तुषार रघुनाथ हिंगे, नगरसदस्य, यांना माहे नोव्हेंबर २०१७ व डिसेंबर २०१७ या दोन महिन्यांच्या मा.महापालिका सभांना न्यायालयीन कारणास्तव अनुपस्थित राहण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५० विषय क्रमांक – ०४
दिनांक – १७/११/२०१७
सुचक – मा.अश्विनी जाधव अनुमोदक – मा.स्वीनल म्हेत्रे
संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.स्वीनल म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.३९ मधील विविध सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमाकरीता मंडप व्यवस्था व इतर अनुषंगिक कामे करणे करिता निविदा क्र.२६/७५ – २०१६/१७ अन्वये कामाचे आदेश दिले आहेत. तरी सदर कामाची प्रभागास विविध कार्यक्रमांकरीता आवश्यकता असून नविन कामाची प्रशासकीय बाब पूर्ण करण्यास विलंब होणार आहे. तरी या कामास सुधारित अंदाजपत्रक र.रु.४०,००,०००/- (अक्षरी र.रु.चाळीस लाख फक्त) पर्यंत मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५१ विषय क्रमांक – ०५
दिनांक – १७/११/२०१७
सुचक – मा.अश्विनी जाधव अनुमोदक – मा.स्वीनल म्हेत्रे
संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.स्वीनल म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

काळेवाडी सर्व्हे नं.१३० मधील नाल्यापसून ते काळेवाडी मुख्य रस्त्यापर्यंत नदी समांतर १८.०० मी.रुंद डी.पी.रस्त्याचे रुंदीकरण करणे व हॉटमिक्स पध्दतीने डांबरी करण करणे या कामातून प्रभाग क्र.४७ काळेवाडी मधील इतर अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणेस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत निविदा क्र.३९/०५-२०१४/१५ या कामाला मंजूरी मिळालेली होती तथापि सदर कामाचे ठिकाणी अनाधिकृत बांधकामे होती व तसेच सदर रस्त्याची जागा मनपाच्या पुर्णपणे ताब्यात आलेली नाही. त्यामुळे तत्कालीन मा.नगरसदस्य व नागरिकांनी मागणी

केलेनुसार त्याच वॉर्डातील इतरत्र ठिकाणी म्हणजेच १) नानाश्री हॉटेलसमोरील (तापकीर मळा चौक ते विमल गार्डन रस्ता नाल्यापर्यंत) २) बंडू नढे शाळा ते तापकीर चौक रस्ता, ३) जीवन चौक ते कृष्णा रेसिडेन्सी पर्यंतचा रस्ता, ४) तुकाराम नढे चाळ रस्ता, ५) शंभुराजे कॉलनी रस्ता, इ. या अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम कामाची तातडी व आवश्यकता बघुन पुर्ण केलेले आहे. सदर मुळ निविदेतील कामाच्या रस्त्यांची जागा मनपाचे ताब्यात न आल्याने त्याच वॉर्डातील वरील प्रमाणे नमुद केलेल्या अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेचे कामास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५२ विषय क्रमांक – ०६

दिनांक – १७/११/२०१७

सुचक – मा.अश्विनी जाधव अनुमोदक – मा.स्वाती काटे

संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.६० येथे जुने संडास ब्लॉकचे नुतनीकरण करणेचे उर्वरित कामात मा.नगरसदस्य यांच्या मागणीनुसार प्रभाग क्र.३२ मध्ये स्थापत्य विषयक कामे व इतर अनुषंगिक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची तातडीने अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५३ विषय क्रमांक – ०७

दिनांक – १७/११/२०१७

सुचक – मा.अश्विनी जाधव अनुमोदक – मा.स्वाती काटे

संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.६० मधील पवना नदीकाठी बैठक व्यवस्था करणे या कामाचे आदेश निर्गत केले आहेत. तरी, प्रभागातील मा.नगरसदस्य यांच्या मागणीनुसार या कामाअंतर्गत आवश्यक त्या ठिकाणी विसावा शेड बसविणे, बेंचेस बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची तातडीने अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५४ विषय क्रमांक – ०८

दिनांक – १७/११/२०१७

सुचक – मा.स्वीनल म्हेत्रे अनुमोदक – मा.स्वाती काटे

संदर्भ – मा.स्वीनल म्हेत्रे, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

दापोडी ते निगडी या बीआरटीएस कॉरीडॉरवर माहे डिसेंबर २०१७ मध्ये बीआरटीएस बसची ट्रायल रन घेणेचे मनपाचे नियोजन आहे. सदर रस्त्यावरील ११ बस थांब्यांची ८०% कामे

पूर्ण झालेली असून उर्वरित कामे तातडीने पुर्ण करणे आवश्यक आहे. बीआरटीएस विभागातील काळेवाडी फाटा ते देहु-आळंदी रस्त्यावर बीआरटीएस बस थांब्याची उर्वरीत कामे करणे हे काम निविदा नोटीस क्र.१५/३-२०१७-१८ अन्वये मे.बी.के.खोसे हे ठेकेदार करीत असून स्विकृत निविदा दर हा १३.७२% कमी असा आहे. सदर कामाच्या बचतीमधून दापोडी ते निगडी या रस्त्यावरील बस थांब्यांची उर्वरित कामे करता येतील व या कॉरीडॉरवरील बस स्टेशन्सची कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी खालील निविदा कामामधील जागेतील बदलास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | निविदा क्रमांक | सध्या चालू असलेल्या कामाचे नाव | नियोजित ठिकाणच्या रस्त्याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | १५/३ – २०१७-१८ | काळेवाडी फाटा ते देहु आळंदी या रस्त्यावर बीआरटीएस बस थांब्याची उर्वरित कामे करणे. | दापोडी निगडी या रस्त्यावरील बीआरटीएस बस थांब्याची उर्वरित कामे करणे. |

तरी बीआरटीएस विभागातील उपरोक्त तक्त्यात नमुद केल्यानुसार कामे करणेकामी स्थळ बदलास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५५ विषय क्रमांक – ०९

दिनांक – १७/११/२०१७

सुचक – मा.स्वीनल म्हेत्रे अनुमोदक – मा.स्वाती काटे

संदर्भ – मा.स्वीनल म्हेत्रे, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

बोपखेल फाटा ते आळंदी रस्ता विकसीत करणे भाग २ हे काम मे.कृष्णाई कन्स्ट्रक्शन हे ठेकेदार करीत आहे. सदर कामांमधून या रस्त्यालगतच्या काटे कॉलनी क्र.१ ते ५ व संस्कार ग्रुप येथील रस्त्यांची डांबरीकरण करणे व अनुषंगिक कामे करणेबाबत मा.महापौर यांनी मागणी केली आहे. सदर कामाची निविदा र.रु.४६,७७,९५,३५२/- असून निविदा दर हा १७.५७% कमी असा स्विकृत केलेला आहे. सदर कामाच्या बचतीमधून खालीलप्रमाणे कामामधील जागेतील स्थळ बदलास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | निविदा क्रमांक | सध्या चालू असलेल्या कामाचे नाव | नियोजित ठिकाणच्या रस्त्याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | १०/२ – २०१४-१५ | बोपखेल फाटा ते आळंदी रस्ता विकसीत करणे भाग २ (सा.क्र. ७/०४० ते ८/२५० कि.मी.) | १)काटे कॉलनी क्र.१ ते ५ मधील जोड रस्ते.<br>२) संस्कार ग्रुप येथील जोड रस्ते. |

तरी बीआरटीएस विभागातील चालू असलेल्या उपरोक्त तक्त्यात नमुद केल्यानुसार कामे करणेकामी स्थळ बदलास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सोनवणे शारदा हिरेन )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१२६३/२०१७
दिनांक : १८/११/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2017 sub committee sabhapati.doc